# कॉम्प्युटर-टायपिंग शिक्षण व कौशल्य विकास संस्था, रायगड

**(रजि.क्र.एफ–११५५६ रायगड )**

रजि. पत्ता :– द्वारा श्री.पंकज ए. ठाकूर, वासूदेव कॉम्प्लेक्स, शॉप नं.८, अलिबाग एस.टी. स्टॅन्ड जवळ,

ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१ E-mail :- ctskvsraigad@gmail.com

**संलग्न :– महाराष्ट्र राज्य टंकलेखन संगणक टायपिंग शासनमान्य संस्थाची संघटना, मुंबई (www.msceia.in)**


दिनांक : ८ ऑगस्ट २०२०


**श्री.पंकज ए. ठाकूर**
**रायगड जिल्हा अध्यक्ष**
**तथा राज्य कार्यकारीणी**
**जिल्हा प्रतिनिधी**
मो.९६६५४७२३५५
ता.अलिबाग

**श्री.समीर म. गोरे**
**रायगड जिल्हा उपाध्यक्ष**
मा.९४२२४९५८०९
ता.महाड

**श्री.राजेश म. श्रीवर्धनकर**
**सचिव**
मो.७७५७८७७५५७
ता.रोहा

**श्री.निलेश अ. भायदे**
**खजिनदार**
मो.९२७२६९४५९५
ता.मुरुड

**श्री.गणेश रा. म्हात्रे**
**सदस्य व ज्येष्ठ सल्लागार**
मो.९४२२६९२९५८
ता.सुधागड

**सौ.अनुजा अ. सावंत**
**सदस्या**
मो.८८८८६०७०६१
ता.माणगाव

**सौ.सुजल वि. पडवळ**
**सदस्या**
मो.८४११९८८२००
ता.श्रीवर्धन


प्रति,
**मा. मुख्यमंत्री साहेब,**
महाराष्ट्र राज्य
यांचे सेवेसी सविनय सादर,

**विषय :– रायगड जिल्हयातील शासन मान्यताप्राप्त कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीटयूट ना संस्था चालू करणेची परवानगी मिळणेबाबत..**

सन्मानिय महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मान्यतेने GCC-TBC कॉम्प्युटर टायपिंग या शासनमान्य कोर्स चे प्रशिक्षण देणाऱ्या आमच्या संस्थे अंतर्गत रायगड जिल्हयात एकूण ४० कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीटयूट कार्यरत आहेत. सदर सर्व कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीटयूट, केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार १६ मार्च २०२० पासून पूर्णपणे बंद आहेत. जानेवारी ते जून असा ६ महिने कालावधीचा GCC-TBC कॉम्प्युटर टायपिंग चा कोर्स असतो. सद्यपरिस्थितीत जवळपास ५ महिने आमच्या संस्था बंद आहेत.या कालावधित जानेवारी २०२० ते जून २०२०हे एक सहा महिन्याचे पूर्ण सत्र परिक्षा परिषदे कडून रदद करण्यात आले आहे.त्यामूळे सर्व संस्था चालकांचे प्रचंड नूकसान झाले आहे. इन्स्टीटयूट बंद आहेत त्यामुळे विद्यार्थी येत नाहीत आणि विद्यार्थी येत नाहीत म्हणून आम्ही संस्थाचालक विद्यार्थ्यांकडे फी मागू शकत नाही. यामुळे आम्हा सर्व संस्था चालकांवर मोठे आर्थिक संकट उभे राहीले आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारी कोविड–१९ रुग्णाची संख्या व वाढता लॉक डावून यामुळे घरखर्च, जागेचे भाडे, लाईट बिल, कर्जाचे हप्ते, स्टाफ चे पगार इतर आवश्यक खर्च यामुळे आम्ही सर्व संस्थाचालक प्रचंड मानसिक तणावाखाली आहोत. अनेक संस्था चालकांनी कर्ज काढून संगणक सेटअप उभे केले आहेत, सदर कर्जाचे हप्ते हे गेल्या चार महिन्यापासून संस्थाचलकांनाच्या आगावर पडले आहेत. त्याच प्रमाणे आमच्या इन्स्टीटयूट मध्ये काम करणाऱ्या आमच्या कर्मचारी वर्गाचा पगारही गेले पाच महिन्यापासून आमच्या अंगावर पडला आहे.

आमच्या सर्व शासनमान्य संस्था विनाअनुदानित असल्या कारणाने सद्यपरिस्थितीत रायगड जिल्हयातील जवळपास चाळीस कॉम्प्युटर टायपिंग संस्थाना शासनाकडून कोणतिही आर्थिक मदत मिळत नाही, ना आम्हा संस्थाचालकांना आपल्या संस्था चालू करणेस शासनाकडून परवानगी मिळत आहे, त्यामूळे रायगड जिल्हयातील सर्व संस्था चालकानवर उपासमारीची वेळ निर्माण झाली आहे. लॉकडाउन शिथील केल्याच्या काळापासून अनेक व्यवसाईकाना त्याचे व्यवसाय चालू करणेसाठी शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे, यात प्रामख्याने दारू विक्रि केंद्र, कपडयाची दुकाने, स्टेशनरी दुकाने, सलून, रस्त्यावरील टी स्टॉल्स या सारख्यांचा समावेश आहे. मात्र आमच्या सारख्या शासनमान्यता असलेल्या कॉम्प्युटर टायपिंग शिक्षण संस्थाना चालू करणे बाबत अद्याप शासनाकडून परवानगी मिळालेली नाही.

गेले पाच महिन्या पेक्षा अधिक काळ आम्ही शासन आदेशाचे पूर्णपणे पालन करत आमच्या संस्था पूर्ण बंद ठेवल्या आहेत, व शासनाला पुर्ण सहकार्य केले आहे. मात्र आता संस्था चालू करणेस परवानगी न मिळाल्यास गेल्या पाच महिन्यापासून कठीण परिस्थितीत असलेला जिल्हयातील गरिब संस्थाचालक पूर्णपणे हतबल होउन जाईल यात शंका नाही.

# कॉम्प्युटर-टायपिंग शिक्षण व कौशल्य विकास संस्था, रायगड


**(रजि.क्र.एफ–११५५६ रायगड )**

रजि. पत्ता :– द्वारा श्री.पंकज ए. ठाकूर, वासूदेव कॉम्प्लेक्स, शॉप नं.८, अलिबाग एस.टी. स्टॅन्ड जवळ,

ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१ E-mail :- ctesds@gmail.com


**संलग्न :– महाराष्ट्र राज्य टंकलेखन संगणक टायपिंग शासनमान्य संस्थाची संघटना, मुंबई** (www.msceia.in)

---


**श्री.पंकज ए. ठाकूर**
**रायगड जिल्हा अध्यक्ष**
**तथा राज्य कार्यकारीणी**
**जिल्हा प्रतिनिधी**
मो.९६६५४७२३५५
ता.अलिबाग

**श्री.समीर म. गोरे**
**रायगड जिल्हा उपाध्यक्ष**
मा.९४२२४९५८०९
ता.महाड

**श्री.राजेश म. श्रीवर्धनकर**
**सचिव**
मो.७७५७८७७५५७
ता.रोहा

**श्री.निलेश अ. भायदे**
**खजिनदार**
मो.९२७२६९४५९५
ता.मुरुड

**श्री.गणेश रा. म्हात्रे**
**सदस्य व ज्येष्ठ सल्लागार**
मो.९४२२६९२९५८
ता.सुधागड

**सौ.अनुजा अ. सावंत**
**सदस्या**
मो.८८८८६०७०६१
ता.माणगाव

**सौ.सुजल वि. पडवळ**
**सदस्या**
मो.८४११९८८२००
ता.श्रीवर्धन


आपले राज्य शासन व आपले जिल्हा प्रशासन कोविड–१९ बाबत जनजागृती करुन आवश्यक काळजी घेवून हळूहळू सर्व व्यवसाय त्या त्या विभागात सुरु करत आहे. या अनुषंगाने मी विनंती करतो की, रायगड जिल्हयातील आमच्या सर्व शासनमान्य कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीटयूट ना देखील GCC-TBC कॉम्प्युटर टायपिंग या शासनमान्य कोर्स चे प्रशिक्षण देणेची परवानगी मिळावी जेणेकरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. तसेच यामुळे आम्हा संस्थाचालकांचे मासिक उत्पन्न देखील सुरु होईल. संस्था सूरू करताना आमचे संस्थाचालक मा. आयुक्त, परिक्षा परिषद पूणे यांच्या कडून देण्यात आलेल्या नियमावलीचे पूर्णपणे पालन करण्यात येतल व योग्य ती काळजी घेण्यात येईल.

या अर्जाचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार करावा व लवकरात लवकर कॉम्प्युटर टायपिंग संस्था सूरू करण्यास परवानगी द्यावी अशी मी सर्व मान्यताप्राप्त कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीटयूट संस्थाचालकांचे वतीने पून्हा एकदा विनंती करतो,

मेहरबान असावे,

आपला नम्र

(पंकज ठाकूर)
रायगड जिल्हा अध्यक्ष

सोबत : १) मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे दि १६ जून २०२० चे पत्र.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
Email id :- mscepune@gmail.com
फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/ 1268
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१,
दिनांक :- 26/०६/२०२०.

प्रति,

सर्व प्राचार्य / संस्थाचालक
महाराष्ट्र व गोवा राज्य

**विषय :- शासकीय वाणिज्य शिक्षण संस्था सुरु करणेबाबत..**
**संदर्भ :- १) महाराष्ट्र शासनाचे दि.३०.०५.२०२० च्या मार्गदर्शन सूचना.**
**२) १५ जून २०२० चे शालेय शिक्षण विभागाचे परीपत्रक.**
**३) या कार्यालयाचे दि.२०/०४/२०२० चे आदेश**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कोवीड १९ या कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे शासनाने दि.१८ मार्च २०२० पासून संचारबंदी लागू केल्याने महाराष्ट्रातील सर्व शैक्षणिक संस्था बंद करण्यात आल्या त्यामुळे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जानेवारी २०२० ते जून २०२० चे सत्र रद्द करण्यात आले. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये दि.०१ जून २०२० पासून संचारबंदीत शिथिलता दिल्याने व संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये शैक्षणिक संस्था सुरु करणेची परवानगी दिल्याने संस्था सुरु करणेबाबत शासकीय वाणिज्य संस्थांनी (संगणक टायपिंग, मॅन्युअल टायपिंग, लघुलेखन) पुढील अटींच्या अधिन राहुन कार्यवाही करावी. वाणिज्य शैक्षणिक संस्थांनी दि.०१ जुलै २०२० पासून संस्था सुरु करणेस या पत्राव्दारे परवानगी देण्यात येत आहे.

१. स्थानिक प्रशासन जिल्हाधिकारी, तहसीलदार आपत्ती व्यवस्थापन समितीच्या आदेशाचे वेळोवेळी पालन करावे लागेल. तसेच संस्था सुरू करणेसाठी स्थानिक प्रशासनाची योग्य ती परवानगी घेऊन तसेच त्या त्या क्षेत्रात लागू असलेल्या निर्बंधानुसार संस्था सुरु करणेची कार्यवाही करावी.
२. महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारीत नियमावली, २०१६ तील प्रकरण २ मधील मुद्दा क्र.११.२ नुसार सरावासाठी १२ × १२ चा हॉल ठेवून प्रत्येक संगणक / टंकलेखन यंत्रात किमान ७ चौरस फूट या प्रमाणात जागेची सोय करावी लागेल.
३. प्रत्येक विद्यार्थ्यांचे हॉल प्रवेशाचे वेळी सॅनीटाईज करावे. साबणाने हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था करावी.तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे व सर्व संबंधितांचे थर्मल स्कॅनिंग करावे.
४. दोन बॅचेस मधे अर्धा तास अवकाश ठेवून प्रत्येक वेळी हॉल स्वच्छ व संगणक व टंकलेखन सॅनिटाईज करावीत.
५. महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम, १९९१ ची सुधारीत नियमावली, २०१६ तील प्रकरण २ मधील मुद्दा क्र.११.७ नुसार कोवीड १९ ची लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेश देवू नये.
६.शासन निर्धारीत फी पेक्षा जास्त फी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येवू नये.
७. शक्यतो उमेदवाराने हॅण्डग्लोजचा वापर करावा. मास्क लावणे बंधनकारक राहील.
८. हॉलमध्ये किमान ०५ ते ०८ उमेदवार व ०१ इंन्स्ट्रक्टर (अध्यापक) शिवाय इतरांना प्रवेश निषिध्द करावा.

९. विद्यार्थी व त्यांचा पालकांचा दूरध्वनी क्रमांक घेवून नेहमी संपर्क करावा. तसेच जिल्हा, तालुका, प्रशासन आरोग्य विभागाचा संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावा. कोवीड १९ च्या प्रार्दुभाव रोखण्यासाठीच्या आरोग्य विभागाच्या दिलेल्या सूचना दर्शनी भागात लावाव्यात व त्या सूचनांचे पालन होईल यादृष्टीने कार्यवाही करावी.

१०. संस्थाचालकांनी सर्व व्यवहार ऑनलाईन करावे. प्रवेशाचा कालावधी १५ जून ते १५ जुलै २०२० पर्यंत असा निश्चित केलेला आहे.त्यासाठी गुगल फॉर्म विकसीत करून विद्यार्थी प्रवेश देण्यात यावेत.

११. शक्यतो स्थानीक उमेदवारांनाच प्रवेश द्यावा.

१२. प्रत्येक विषयासाठी (संगणक, टंकलेखन, लघुलेखन) स्वतंत्र बैठक व्यवस्था असावी.

१३. विद्यार्थ्यांच्या कुटुंबात अथवा निवासस्थान परीसरात कोवीड १९ चा रूग्ण नसल्याची खात्री करावी.

१४. प्रत्येक संस्थाचालकांने व सर्व विद्यार्थ्यासहित संबंधित सर्वांनी आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करणे बंधनकारक करावे.

१५. प्रत्येक उमेदवाराचे आरोग्य कार्ड तयार करून शारिरीक तापमान, सर्दी-खोकला यांच्या दैनंदिन नोंदी घेण्यात याव्यात.

१६. कोवीड १९ च्या नियमानुसार संस्थेच्या विद्यार्थी क्षमतेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना एक दिवसाआड विभागून विद्यार्थ्यांचे ८० % उपस्थिती पूर्ण करुन म्हणजेच ६० % तास अशी पूर्ण होण्याची कार्यवाही करावी.

१७. जानेवारी २०२० ते जून २०२० या सत्रातील विद्यार्थ्यांचे राहिलेले तास पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करावे.

१८. वरील प्रमाणे शासकीय परिपत्रक वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयांचे पालन करणे सर्व संस्थांना बंधनकारक राहिल. याबाबत काही त्रुटी आढळल्यास संबंधित संस्था जबाबदार राहिल व नियमानुसार संबंधित संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

12.06.2020

(दत्तात्रय जगताप)
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई ३२
२) मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी:

१) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व.
२) शिक्षणाधिकारी (माध्य),जिल्हा परिषद सर्व.

Desktop/GUNJAL SIR TYPING DOC 2652020